जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in

६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

☎ : (०२०) २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖

स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया

संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ४९ वे ❖ अंक ६ वा ❖ फेब्रुवारी २०१८ ❖ वीर संवत २५४४ ❖ विक्रम संवत २०७४

या अंकात

| | पान नं. |
|---|---|
| • ।। जिनेश्वरी ।। अध्याय २२ – रथनेमि | १५ |
| • धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहा | १९ |
| • भगवान बाहुबली की विशाल मूर्ति – महामस्तकाभिषेक महोत्सव | २१ |
| • श्रुतदीप रिसर्च फाऊंडेशन – श्रुत संवाद कार्यक्रम, पुणे | २३ |
| • हमारी श्रुतसंपदा अतीत, वर्तमान और भविष्य | २५ |
| • ऐसी हुई जब गुरुकृपा – एटम बम ना छोड | २८ |
| • संतोष और असंतोष | ३१ |
| • कव्हर तपशील | ३२ |
| • समभाव | ३३ |
| • दांम्पत्य – जीवन का मंगलसूत्र | ३९ |
| • आदमी 'सोच' है (३) | ४१ |
| • वैज्ञानिक दृष्टी से जैन सिध्दान्त | ५१ |
| • मृत्यु को महोत्सव बनाएँ–छोडने में सुख है | ५३ |
| • महावीर की दृष्टी में अचौर्य | ५५ |
| • कार्यकर्ताओं का मूल्यांकन | ५६ |
| • हास्य जागृति | ५९ |
| • व्हॅलेंटाईन डे – रंग प्रेमाचा | ६० |
| • सुखी जीवन की चाबियाँ – अजीर्ण में भोजन त्याग एवं कालोचित भोजन – II | ७१ |
| • विरति पर विरक्ति भरी | ८१ |
| • बूँन्द–बूँन्द में सागर | ८३ |
| • भगवती सूत्र सेमिनार – निबंध वाचन | ८९ |
| • अरे माणसा माणसा... | ९१ |
| • सूर्य नमस्कार | ९२ |
| • आचार्य रत्नसेन सुरिश्वरजी म.सा. | ९९ |
| • मातंग समाज, पुणे | १०० |
| • जैन क्रॉन्फ्रेंस, वीर माता–पिता पुरस्कार | १०१ |
| • अर्हम् गर्भ संस्कार, अहमदनगर | १०३ |
| • क्रेडाई महाराष्ट्र सभा – अहमदनगर | १०४ |

- प्लॅनेट आर रिअॅल्टी – तळेगाव १०५
- तातेड परिवार रक्तदान शिबिर १०६
- विजय वल्लभ स्कूल, पुणे १०७
- BJS राष्ट्रीय अधिवेशन – भद्रावती तीर्थ १०८
- दादावाडी, पुणे १११
- वैकुंठ स्मशान भूमिचा राजा – कुमारपाल शहा ११२
- ओम गुरु आनंद गोशाला – मावडी ११४
- चारित्र की शोभा – ज्ञान और सुध्यान १ ११६
- जागृत विचार ११७
- गुरु ११८
- आँखों में क्या है ? ११८
- क्या प्रार्थनाओं का जबाब मिलता है ? १२०
- विविध धार्मिक, सामाजिक व राजकिय बातम्या


जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० रु. |

या अंकाची किंमत ५० रुपये.

- www.jainjagruti.in
- www.facebook.com/jainjagrutimagazine


# जैन जागृति मासिकाचे ग्राहक बना !

- वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.
- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. • 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

## जैन जागृति – वर्गणीचे दर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |

वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**JAIN JAGRUTI - BANK ACCOUNT DETAILS**

Bank : STATE BANK OF INDIA — Branch : Market Yard, Pune 37.
Current A/c No. : 10521020146 — IFS Code : SBIN0006117

## जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजय:९८२२०८६९९७ सुनंदा:९४२३५६२९९१, www.jainjagruti.in**

**Email : jainjagruti1969@gmail.com • Press Email : prakash.offset@rediffmail.com**

### ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

❖ **भोसरी, चिंचवड, निगडी –** श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९११९४०९

❖ **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी –** श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१

❖ **गुरूवार पेठ, पुणे –** श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८

❖ **धनकवडी, पुणे –** श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५

❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे –** निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७

❖ **सदाशिव पेठ परिसर, पुणे –** सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०

❖ **वडगाव शेरी, पुणे –** सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६

❖ **वडगाव मावळ, पुणे –** श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१

❖ **खडकी, पुणे –** श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४

❖ **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव –** श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२११३००५५९

❖ **दापोडी, पुणे –** श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६

❖ **नांदेड सिटी, पुणे –** श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६

❖ **दौंड, श्रीगोंदा –** श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२

❖ **अहमदनगर –** श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०

❖ **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका –** श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०

❖ **सोनई –** श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७–२३१४६१, मो. ९८८१४१४२१७

❖ **औरंगाबाद –** श्री. सुभाषचंदजी मांडोत–फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१

❖ **मुंबई** खारघर– श्री. मदनलालजी गांधी–मो. ९८२०५३६७९३

❖ **नाशिक –** श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३–२३११००८,मो.९४२३९३९९९०

❖ **नाशिक –** मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५

❖ **बीड –** श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४

❖ **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२

❖ **श्रीरामपूर –**श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७

❖ **बारामती–** डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२–२२३८०७ मो.:९३२५००४९५०

❖ **अमळनेर, जि. जळगाव –** श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७

❖ **जळगाव –** श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५

❖ **धुळे –** श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६

❖ **शहादा, जि. नंदुरबार –** श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६

❖ **इचलकरंजी, जि. कोल्हापूर –** श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८

❖ **मिरज, जि. सांगली –** श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८

❖ **कोल्हापूर –** सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१–२६९५४३३

❖ **सातारा व सातारा जिल्हा –** श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत

# ।। जिनेश्वरी ।।

**प्रवचनकार : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.**

**भावानुवाद : साध्वी श्री ओजसदर्शनाजी म.सा., सौ. योगिता चंगेडे** *(क्रमश:)*

## अध्याय - २२ : रथनेमि

**'कर्मांचे बंधन तोडणे**
**आपल्या हातात असते,**
**परंतु नात्याचे अनुबंधन तोडता येत नाही**
**ते जगावेच लागते'**

### नात्यांची गाथा

नाती कशी जगवतात व जागवतात याचे सुंदर वर्णन करणारा हा अध्याय. जसे कर्मांचे बंधन असते तसेच नात्याचे ही अनुबंधन असते, कर्माचे बंधन तोडणे आपल्या हातात असते परंतु नात्याचे अनुबंधन तोडता येत नाही, ते जगावेच लागते. शरीरा बरोबर जुळलेले नाते शरीराबरोबरच संपले जाते. मनाशी जडलेले नाते मन फिरले की फिरून जाते. धनाशी जोडलेले नाते धन खुटले की तूटून जाते. परंतु चैतन्याशी जुळलेले नाते शरीर समाप्त झाले, मन संत्रस्त झाले, भटकले, धन खुटले तरी तुटत नाही.

बहुतांशी लोकांची धारणा असते की मृत्यूबरोबर नाती संपतात परंतु जिनशासनाची मान्यता आहे की नाती रडवितात... नाती हसवितात... नाती विस्तवासही चंदन बनवितात.. नाती नंदनवनाचे वाळवंट करतात. नातीच ध्येयापासून विचलीत करतात. नातीच ध्येयापर्यंत पोहोचविण्यास मदतही करतात लक्षात ठेवा बंधुनो,

स्वत:चे पुण्य पाप बनून जाते तेंव्हा पापी माणसाशी नाते जोडले जाते.

स्वत:चे पाप पुण्यात बदलते तेंव्हा पुण्याशाली नाते जोडले जाते.

भीष्म पितामहाचे सर्व पुण्य दु:खरूप झाले दुर्योधन दु:शासनाशी नाते जोडल्यामुळे. कर्णाचे सर्व पुण्य पापमय - संतापमय झाले दुर्योधनाशी जोडल्यामुळे. चंडकौशीक सारख्या विषारी सर्पाचे सर्व पाप पुण्यरूप झाले; प्रभु महावीरांशी जोडले गेल्यामुळे. नाती गोड असतात त्याला श्रद्धेची जोड असली तर, नाती कडू होतात त्याला स्वार्थाची जोड असेल तर. शारीरिक नाते टोचते, मनाचे नाते भटकायला लावते. धनाचे नाते लाचारी करण्यास भाग पाडते. परंतु चेतनेचे नाते जन्म-जन्मांतरी सिद्धी-समाधी प्राप्त करून देते.

अशाच एक मधुर नात्याची गाथा भ. अरीष्टनेमी व राजुलची व याच नात्याच्या त्रिकोणातील तिसरा कोन रथनेमीची ही कथा.

### प्रीतीची गाथा- अरिष्टनेमी व राजुल

भगवान अरिष्टनेमी, रथनेमी, सत्यनेमी, व दृढनेमी चे चार भाऊ. श्रीकृष्ण वासुदेव व बलदेव हे भ.अरिष्टनेमींचे चुलत भाऊ. भ. अरिष्टनेमी हे २२ वे तीर्थकर. राजा समुद्रविजय व राणी शिवा यांचा पुत्र असलेले भ. अरिष्टनेमी जन्मले शौरीपुर नगरात तर दीक्षा संपन्न झाली द्वारीका नगरीत. भ. अरिष्टनेमी असे एकमेव तीर्थंकर आहेत ज्यांची जन्मभूमी व दीक्षाभुमी वेगवेगळी आहे. बाकी २३ तीर्थंकर जीथे जन्मले तीथेच दीक्षा संपन्न झाली.

राजा उग्रसेनची कन्या, राजुल-सुशील, नयनभिरामि, सौंदर्यशाली, राजुलच्या सौंदर्याला

उपमादिली गेली, विज्जु सोया माणिप्पभा...... जशी वीज चमकते असे सळसळते सौंदर्य.

अरिष्टनेमी व राजुलचे एक दोन नाही तर सात जन्माचे नाते. शरीर बदलले, संस्कार बदलले जागाबदलली पण नाते दृढ होते. सातही रूपात सहचारीच्या रूपातच यात्रा करणारे हे नाते आठव्या जन्मातही प्रीतीचे, मिलनाचे गीत गाऊ लागले.

सौदामीनीचे तेज व ओज असणाऱ्या राजुलचे नाव श्रीकृष्ण वासुदेव भ. अरिष्टनेमी साठी सुचवितात. राजा उग्रसेन अट घालतात, अरिष्टनेमी, जर माझ्या अंगणात आला तरच मी त्याला माझी कन्या देईन. अरिष्टनेमीनी अट मान्य केली व लग्नाची तयारी सुरू झाली.राजुलचा आनंद गगनात मावेनासा झाला. जन्मोजन्मीचे नाते अंतरंगात साद घालीत होते, प्रीतीचे गीत गात होते, राजुल मोहोरली, अरिष्टनेमीनाही ओढ लागली. लग्नाची तयारी झाली, वरात निघाली परंतु... राजुल व अरिष्टनेमींच्या या नवव्या जन्मातील जीवनयात्रेतील पुढील अकल्पनीय प्रसंग, प्रीतीपासून विरक्तीपर्यंतचा प्रवास, विवाहापासून संन्यासापर्यंतची गाथा सांगणारी ही काव्यमय कथा....

## प्रीतीपासून विरक्तीपर्यंत

जन्मोजन्मीचे नाते, अंतरंगी गीत गाऊ लागले,
जन्मोजन्मी जगले ज्याच्यासह तो येण्याचे वेध लागले.
प्रियकर माझा, मला भेटण्या येणार आज माझ्या अंगणी
सात जन्मापासून आहे मीच त्या सखी-सजनी
हृदयातील गीत हृदयात जाऊन पोहोचले,
अरिष्टनेमींचेही हृदय हळूवार हरकले, वदले
येईन तुझ्या अंगणात, घेउन जाईन माझ्या गगनात
गगनातील माझ्या एकच आहे तू चंद्रकोर,
म्हणूनी तुला भेटण्यासाठी आलो या वाटेवर,
दोन्ही हृदये स्पंदीत झाली, एकच लय, एकच ताल...
निघाले अरिष्टनेमी होउनी हत्तीवर स्वार
जवळ जवळ येत होते प्रियतमेचे द्वार
आणि अचानक... कानी आला क्रंदनाचा आवाज
बंद झाले अंतरंगातील मधुर मिलनाचे साज
प्रश्न पडला मनात, अचानक... आनंदात हे विरजन कसले ?
नंदनवनात हे क्रंदन कसले ?
क्रीडेच्या समयी पीडा.. ? मिलनाच्या वेळी विलाप...?
आनंद वनाच्या डोही आक्रोश वादळल्
वदले अरिष्टनेमी सारथ्याला
हे क्रंदन कसले, सांगशील का तू मजला ?
सारथी म्हणाला
स्वामी ! महोत्सव तुमचा, मृत्यू त्यांचा
भोजन पाहुण्यांना, मरण मुक जीवांना
हादरला तो लोकनाथ... अंतकरणच जणू थिजून गेले
ऐकून क्रंदन प्राण्यांचे... गात्र न गात्र भिजून गेले.
आर्तस्वर मूक जीवांचे...... हृदय पीळवटले अरिष्टनेमींचे
आणि मग......
गरजला तो पुरूषसिंह, फोडली त्याने डरकाळी
नाही.. नाही... आता हे शक्य नाही.
होऊ नाही देणार या प्राण्यांची होळी,
आता नाही लग्नाची मोळी,
आता नाही वरातीची भोजनावळी
या मुक जीवांचे हाय घेउनी नाही मी ध्येय गाठणार,
आक्रंदनाच्या पायावर नाही आनंदाची उभारणी होणार
काहुर माजले विचारांचे, भावनांचा प्रलय झाला
धरती हादरली.... आकाश फाटले....
सगळ्यांचे कंठ दु:खाने दाटले
अंगणात येता येता वरात मागे फिरली,
बोहल्यावरी चढता चढता विरक्ति आली
ऐकूनी सारा खेळखंडोबा, राजीमती मुर्च्छीत झाली
अपराध कोणाचा ? अन् शिक्षा कुणाला ?
पंचमुष्ठी लुंचन करूनी नेमींनी दीक्षा घेतली
प्रीतीचे गीत हरपले अन् व्यथा गाऊ लागली

धिक्कार माझ्या जीवनाचा, सोडून गेला साजन माझा
वचन दिले होतेस तू मला, मग का नाही मला घेउन गेला ?
अंगणात येता येता, मलाच ठोकरून गेला
सांगितले होतेस तू मला...
येईन तुझ्या अंगणात, घेउन जाईन माझ्या गगनात
वचन तोडलेस तू प्रियतमा, माझ्या मनाची नाही केली तमा !
सात जन्मात सोबत केली मला, या जन्मी अर्ध्यावरी डाव मोडूनी गेला...
ऐकलेस तू प्राण्यांचे क्रंदन, नाही ऐकलेस तू माझे रूदन
तू करूणेचा महासागर, केलीस त्या जीवांवर मायेची पाखर
कशी घालु मी माझ्या भावनांचा आवर...
हत्तीवरूनी आला होऊनी तयार, गेला पालखीत होऊनी स्वार
हृदयी माझ्या झाले सहस्त्र सहस्त्र प्रहार
तू ठोकरलेस मला....
पण मी नाही ठोकरली जाणार
तुच माझे गीत, तुच माझे संगीत
जन्मोजन्मीची आपली प्रीत, कशी तुटेल ही रीत?
तू साजन, तर मी सजनी, तू योगी, तर मी योगिनी
गाऊ भगवंताचे गीत, गाऊ भक्तिचे संगीत
तुच त्रिलोकीनाथ, तुच जगन्नाथ
तुच करूणामूर्ती, तुच धर्मचक्रवर्ती
जा जा भास्करा उदयाचली, बघ रंग उधळले
रंगीन झाले गगनमंडळ हे सुर्यबिंब हे आता उजळले
तू चाललास ज्या वाटेवरी, जगा मिळेल दिशादर्शन
या पथाने पथिक पावन होतील, पावतील ते आत्मस्पर्शन

## प्रेमपुजारी रथनेमी

प्रीतीपासून विरक्तिपर्यंत, विवाहापासून संन्यासापर्यंतचा हा घटनाक्रम अरीष्टनेमी व राजुलच्या जीवनयात्रेचा. यात तिसरा कोन जुळतो तो अरिष्टनेमीचा लहान भाऊ रथनेमीचा. अरिष्टनेमी व राजुलच्या विवाहाआधी पासुन राजूलच्या लखलखत्या सौंदर्यावर भाळलेला रथनेमी अरिष्टनेमी संन्यास घेताच राजुलवर आपल्या मोहाचे जाळे पसरविण्यास सुरूवात करतो. राजूलच्या प्रेमात चिंब चिंब भिजलेल्या रथनेमीला राजुल मनी वसे, स्वप्नी दिसे, अशी होते. तो राजूलला प्रेमाची मागणी घालतो. 'माझा भाऊ तर गेला, पण मी आहे. माझे तुझ्यावर प्रेम आहे. तू माझा स्वीकार कर.'वारंवारच्या त्या विनंतीवर राजुल त्याला सांगते, 'ठिक आहे मला तुझ्याकडून उत्तमोत्तम उपहार हवा. रथनेमीला वाटते सादाला प्रतिसाद मिळाला. पूजेचा प्रसाद मिळाला. रथनेमीला आकाश ठेंगणे झाले. त्याकाळाचा सर्वोत्तम पदार्थ गोरस, गोदुग्ध सुवर्ण पात्रात घेऊन येतो व राजुलला देतो. राजुल ते पिते व आत जाऊन त्याच सुवर्ण पात्रात ते वमन करते. बाहेर येऊन रथनेमीला ते पिण्यास सांगते आता मात्र रथनेमी गोंधळतो, 'हे शक्य नाही, मी कसा वमन पिऊ शकेन?' राजुल म्हणते 'तू वमन पिऊ शकत नाहीस तर मग मी पण वमनच तर आहे ना ! अरिष्टनेमीने मला त्यागिले आहे, माझे वमन केले आहे मग माझी तू का कामना करीत आहेस ? तू तुझ्या भावाच्या मार्गाचा अवलंब कर.'

राजीमती स्वत:च्या काळ्याभोर केशसंभाराचे स्वत:च्या हातानी लुंचन करून दीक्षा घेते. तिच्याबरोबर ७०० स्वजन-परिजन दीक्षा घेतात. श्रीकृष्ण वासुदेव आशीर्वचन बद्ध करतात. 'हे कन्ये तू हा भयंकर, भवसागर लवकर लवकर पार कर.' तद्नंतर रथनेमीही प्रवज्या ग्रहण करतो. अरिष्टनेमींना दीक्षानंतर ५४ दिवसांच्या साधने नंतर केवलज्ञान प्राप्त होते. राजूल त्यांची आज्ञावासीनी बनून राहू लागते.

## भोगीश्वर बनला योगीश्वर

एकदा रैवतक पर्वतावर अरिष्टनेमींचे दर्शन घेऊन साध्वी परतत असताना मुसळधार पाऊस सुरू होतो.

तिच्या सहयोगी साध्वी दिसेल त्या गुहेचा आश्रय घेतात राजुलही एका गुहेत प्रवेश करते. सर्वत्र अंधाराचे साम्राज्य असते. गुहेत कोणी नाही असे समजुन चिंब भिजलेली राजुल आपल्याशरीरावरील वस्त्रे वाळविण्यासाठी बाजुला करून पसरविते. तोच लखलखत्या विचेच्या प्रकाशात तिला गुहेत पुरूषाकृती दिसते. भयकंपीत राजुल अंग वेष्टीत करून खाली बसते.

प्रभूच्या मार्गावर मार्गस्थ असूनही मनातून राजुलचे प्रेम कमी न झालेला साधू रथनेमी त्याच गुहेत साधनस्थ असतो. तोही यथाजात, निर्वस्त्र त्या सौदामिनीला पाहतो व त्याचे मन पुन: विचलीत होते. तो पुनश्च राजुलला भोगाचे आमंत्रण देत म्हणतो ''हे सुंदरी, हे मनोरम भाषिणी मी रथनेमी आहे घाबरू नकोस, तुला माझ्यापासून काही त्रास होणार नाही.

हे कोमलांगी, हा मनुष्यजन्म अतिदुर्लभ, कठीण आहे. ये आपण सुखोपभोगांना यथारूची सेवन करू व नंतर जिनेश्वरांच्या मार्गाचे आचरण करू.'' ते ऐकताच मात्र त्या सौदामिनीचे तेज तळपते व ती गरजते, ''अरे पापी, तू कितीही सुंदर असलास तरी मी स्वप्नामध्येही तुझी कामीनी होणार नाही. तू नलकुबेर असो की इंद्र असो मी कधीच तुझा स्वीकार करणार नाही. धिक्कार, धिक्कार धिक्कार आहे तुझा ! तुझे मन संयमात असुनही तू भोगीश्वर बनुन जगत आहेस. तू तुझ्या कुळालाही लज्जीत करीत आहेस.

तुझ्या जीवनापेक्षा तुझे मरणच श्रेयस्कर आहे, बेहत्तर आहे. अरे भोगीश्वरा, तू गंधर्व कुळातील सर्प आहेस. कारण अगंधर्व कुळातील सर्प तर स्वत:चे विष पिण्याऐवजी आगीत जळणे पसंत करतो. तू तर तीर्थंकराच्या कुळात जन्म घेऊनही भोगाचे विष पीत आहेस.

अरे भांडपाल, गुराखी कधी गोस्वामी नाही बनु शकत. तु इंद्रियांना चारत राहिलास, इंद्रियांचास्वामी नाही बनु शकला. काचेचे तुकडे हीरे म्हणून सांभाळतो आहेस. भोगाचे विष अमृत म्हणून जपतो आहेस. तु कसा मोक्षमार्ग गाठशील ? जागा हो, स्थिर हो, संयमाचे पालन कर....''

एका क्षणात रथनेमीचा सारा उन्माद उतरला अंकुशाने हत्ती जसा वश होतो तसा रथनेमी ताळ्यावरआला. राजुलने वाहिलेली शिव्यांची लाखोली त्याला सुभाषिताप्रमाणे वाटली. ते पसायदान प्राशन करून रथनेमी स्थिर झाला. उग्र तप:साधना करून केवली बनला. राजुलही केवली झाली. तिघेही साधनामार्ग पार करून सिद्धगतीस प्राप्त झाले. ●



## वधू-वर जाहिरात

## 'जैन जागृति'

## मासिकात व वेबसाईटवर द्या.

**हजारो जैन परिवार व त्यांचे नातेवाईक, मित्रपरिवार पर्यंत पोहचा.**

**आपणांस वधू-वर निवडताना योग्य चॉईस मिळण्यास मदत होईल.**

# हमारी श्रुतसंपदा अतीत, वर्तमान और भविष्य

**लेखक : डॉ. जितेंद्र बी. शाह, अहमदाबाद**

विगत अनेक शताब्दियों से जैन धर्म महत्वपूर्ण उपलब्धियों के कारण विश्व में शीर्षस्थ रहा है, परंतु क्षोम का विषय यह है कि, आज ज्ञान की धारा कुंठित होती जा रही है । वर्तमान स्थिति पर चर्चा करने से पूर्व, जैन श्रुतसंपदा के अतीत, वर्तमान और भविष्य में दृष्टि डालना प्राथमिकता है ।

इतिहासकार श्री धर्मपालजी द्वारा किये गये सर्वेक्षण के अनुसार, भारत में अंग्रेजों के आने से पूर्व पूरे देश में कुल पाँच करोड से अधिक हस्तलिखीत पांडुलिपिया उपलब्ध थी । दुर्भाग्य से पिछले केवल एक सौ पचास वर्षों में चार करोड प्रतियाँ गायब हो गई अथवा नष्ट हो चुकी है और यह सब हम खुली आँखो से देखते रहे। विनाश के कारणों की चर्चा करने के अनेक मुद्दे हो सकते हैं, मगर बडा प्रश्न यह है कि, हम इस विनाश को क्यो नहीं रोक पाये ? उत्तर सरल है - ज्ञान की तरफ हमारी घोर उदासिनता । पिछले सौ वर्षों के कालखंड में इस दिशा में जो कार्य हुए हैं, उनका अवलोकन भी हमें करना होगा । कौन-कौन से कार्य हुए ? कैसे हुए ? उन उपलब्धियों के बाद वर्तमान स्थिति क्या है ? इन्हीं आधारों पर भविष्य के लक्ष्य का निर्धारण भी संभव होगा ।

लगभग पंद्रह वर्ष पूर्व भारत सरकार द्वारा एक 'मिशन' की नींव रखी गई - 'नेशनल मिशन फॉर मेन्युस्क्रीप्टस' (NMM) जिसका लक्ष्य रखा गया - भारत की प्राचीन हस्तलिखीत पांडुलिपियों का संरक्षण करना, प्राचीन लिपि और भाषा के जानकर विद्वानों को प्रतिभा संपन्न बनाना, उपलब्ध साहित्य (पांडुलिपियों) की सूचि तैयार करना, और संपादन में सहायक संसाधनों को उपलब्ध करवाना । भारतीय संस्कृति की रक्षा के दो मुख्य मूलाधार है - प्राचीन स्थापत्य एवं प्राचीन हस्तलिखित साहित्य । स्थापत्य की रक्षा के लिए जागृति भी बनी और बहुत प्रयास भी हुए, मगर शास्त्र रक्षा के लिए कोई सार्थक प्रयास नहीं हुए ।

आज भी विश्व में सबसे प्राचीन शास्त्रों का सार्वधिक संग्रह केवल भारत के पास है । एक करोड पांडुलिपियों में बीस लाख प्रतियाँ केवल जैन शास्त्रों की है । यह भी आश्चर्य की बात है कि, इतने बडे विध्वंस और विनाशलीला में से इतनी बडी संख्या में जैन धर्म की इतनी संपदा कैसे सुरक्षित रह पायी ? मुख्य रूप से जैनधर्म की श्रुतभक्ति की भावना और परंपरागत ग्रंथ रक्षा की शैली के कारण ही यह संभव हो पाया । अन्य परम्पराओं में यह अभाव रहा । आज जैनों के लिए यह अपनेपूर्वजों का बडा उपकार है ।

आज संपूर्ण भारत में एक हजार से अधिक ज्ञानभंडार हैं, जहाँ उपलब्ध बीस लाख पांडुलिपियों में लगभग तीस हजार शास्त्र ऐसे हैं, जिनकी जानकारी भी हमें नहीं है । कौन-सी प्रति किस भंडार में है ? इसकी एकत्रित जानकारी नहीं है । कितने ग्रंथ है, यह भी पता नहीं है। पिछली शताब्दी में पूज्य आचार्य श्री बुद्धिसागरसूरिजी महाराज साहबने 'जैन ग्रंथावली' का कार्य किया था । उसी तरह पुणे स्थित भांडारकर इन्स्टिटयुट में प्रो. हरि दामोदर वेलणकरने 'जिनरत्नकोश' के रूप में बडा कार्य किया । जैन ग्रंथावली में अथवा जिनरत्नक्रोश में एक ही ग्रंथ की भिन्न-भिन्न पांडुलिपियाँ अन्य कौन-कौनसे भंडारों में उपलब्ध है ? इसकी जानकारी है । शोध, संशोधन, संपादन आदि के लिए, एक ही स्थान पर पूरक जानकारी सहजता से मिल सके, इस अभिप्राय के साथ पूज्य मुनिराज श्रीपुण्यविजयजी म.सा. ने इस क्षेत्र

में बहुमूल्य कार्य किया । आगम संशोधन सहित इस कार्य के अध्ययवासी परिश्रम को पू. मुनिराज श्री जंबूविजयजी म.सा. ने आगे वृद्धिंगत किया । इस प्रकार के कार्यों का आज अभाव है । आज ऐसे विश्वस्तरीय कार्य की आवश्यकता है । नियोजनबद्धरूप से तमाम सूचिपत्रों का समन्वय और व्यापक 'डाटाबेस' की बडी आवश्यकता है । इस प्रकार का 'कैटलोग्स ऑफ केटलोगरम (सूचिपत्रों का सूचिपत्र)' बनाने का कार्य पिछले बीस पच्चीस वर्षों से मद्रास युनिवर्सिटी' द्वारा चल रहा है । ''इंदिरा गांधी नेशनल कल्चर एन्ड आर्ट (IGNCA) के अंतर्गतएक उपक्रम शुरू हुआ, जिसका केंद्रवर्ती विचार था कि, भारतीय संस्कृति की आधारभूतता क्या है ? इस संदर्भ में विद्वानों का निष्कर्ष आया कि, प्राचीन शास्त्रों में चार सौ से अधिक शास्त्र ऐसे हैं, जिनके आधार पर हजारों शास्त्रों का सृजन हुआ । जैन शास्त्रों का अवगाहन भी इस दृष्टि से बडा महत्वपूर्ण कार्य है।

जैन शास्त्र संवर्धन के विषय में पूज्य आनंदसागरजी महाराज साहब का नाम उच्चस्थ है । ज्ञान के क्षेत्र में उनके अकेले हाथों से जो कार्य हुआ है, यह खास उल्लेखनीय घटना है । लगभग सौ वर्ष पूर्व आचार्य श्रीधर्मसूरीश्वरजी महाराज साहब (काशीवाला) द्वारा काशी में रहकर संपादन कार्य की नींव रखी गई थी । उनके अथक प्रयास से अनेक प्रकांड पंडित तैयार हुए। पं हरगोविंददास ने पाईयसद्दमहणणवो नामक प्राकृत भाषा कोश बनाया, उसके सम्मुख हम आज सौ वर्ष बाद भी दूसरा शुद्धि-वृद्धि युक्त कोश नहीं बना पाये हैं। हमारे मूलगामी अभ्यास के कार्यों में सबसे अधिक कार्य जर्मनियों ने किया है । ऐसे अनेक ग्रंथ हैं, जिनका पहला संशोधित संस्करण जर्मन से बाहर आया है । विडंबना तो यह है कि, हम उन शास्त्रों की भारतीय आवृत्ति भी आज तक प्रकाशित नहीं कर पाये हैं । जर्मनियों ने संस्कृतभाषा का 'वॉटरबूच' नामक कोष विकसित किया । सात खंडों में उपलब्ध इसका हम अब तक किसी भारतीय भाषा में अनुवाद तक नहीं कर पाये है । श्रुतसंपदा के अतीत और वर्तमान का अध्ययन करने के पश्चात इसके भविष्य का लक्ष्य निर्धारित करने के लिए हमें तीन चरणों में कार्य करने पडेंगे -

१) प्रतिभा संपन्न विद्वान पंडित तैयार करना ।

२) शोध-संशोधन-संपादन और प्रकाशन आदि के लिए उपयोगी संसाधनों की उपलब्धि और उनका सुनियोजित उपयोग ।

३) उपलब्ध श्रुत संपदा की सुरक्षा और संवर्धन के लिए परस्पर व्यापक समन्वय स्थापित करना ।

इस दिशा में ज्ञान की धारा को प्रवाहित करने का नियोजनबद्ध कार्य श्रुतभवन संशोधन केंद्र पुणे द्वारा गतिमान है । मुझे पूर्ण विश्वास है कि, आगामी काल में वैश्विक स्तर का संपादनयुक्त प्रचुर साहित्य इस केंद्र से प्रगट होगा । नि:संदेह भविष्य के रेखांकन की यह मंगलकारी शुरूआत सिद्ध होगी । ●

महाराष्ट्रातील जास्तीत जास्त जैन
समाजापर्यंत पोहचण्याचा सर्वात खात्रीशीर,
सर्वात सोपा व सर्वात स्वस्त मार्ग...
जैन जागृति

## क्व्हर तपशील - फेब्रुवारी २०१८

❖ **भगवान बाहुबली महामस्तकाभिषेक**

श्रमण बेलगोला येथे भगवान बाहुबली यांची ५७ फूट विशाल अतिसुंदर प्रतिमा आहे. दर बारा वर्षांनी येथे महामस्तकाभिषेक आयोजन केले जाते. या वर्षी ७ ते २६ फेब्रुवारी २०१८ या काळात भव्य महामस्तकाभिषेक महोत्सवाचे आयोजन केले आहे. या महोत्सवात संपूर्ण भारत व प्रदेशातून लोक उपस्थित राहातात.

❖ **श्री शत्रुंजय गिरीराज तीर्थ प्रतिकृती, दादावाडी**

पुणे येथील दादावाडी जैन मंदिरात फार वर्षापासून शत्रुंजय गिरीराज तीर्थ प्रतिकृती विराजित आहे. या प्रतिकृतीचे पूनर्निमाण अतिशय सुंदररित्या करण्यात आलेले आहे. या प्रतिकृतीचे उद्‌घाटन १९ जानेवारी २०१८ रोजी श्रीमान सोहनलालजी टेकचंदजी गुंदेचा परिवारातील श्री. अशोकजी व श्री. ललीतजी गुंदेचा यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी दादावाडी ट्रस्टतर्फे श्री. अशोकजी, व श्री. ललीतजी गुंदेचा यांचा सन्मान ट्रस्टी श्री. ओमप्रकाशजी रांका, श्री. भवरलालजी जैन, ॲड. एस. के. जैन, श्री. जयप्रकाशजी ललवाणी इ. मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

❖ **श्रुतदीप रिसर्च फाऊंडेशन, पुणे**

श्रुतदीप रिसर्च फाऊंडेशन संचालित श्रुतभवन संशोधन केन्द्र द्वारा श्रुत संवाद कार्यक्रम ७ जानेवारी रोजी मुनिश्री वैराग्यरतिविजयजी गणिवर यांच्या निश्रेत संपन्न झाला. यावेळी दीप प्रज्ज्वलन प्रमुख वक्ता डॉ. जितेंद्र बी. शहा, फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री. किरीतभाई सेठ, श्री. भरतभाई शहा, श्री. राजेंद्रजी बांठिया, श्री. ललीतजी गुंदेचा, श्री. वर्धमान जैन इ. मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

❖ **भारतीय जैन संघटना अधिवेशन**

भारतीय जैन संघटना यांचे महाराष्ट्र राज्यस्तरीय अधिवेशन ७ जानेवारी २०१८ रोजी भद्रावती तीर्थ, चंद्रपूर येथे संपन्न झाले. संस्थापक अध्यक्ष श्री. शांतीलालजी मुथा, राष्ट्रीय अध्यक्ष श्री. प्रफुलजी पारख, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष श्री. अमरचंदजी गांधी, राज्यसचिव श्री. महेन्द्र मंडलेचा, श्री. नरेंद्रजी पुंगलिया इत्यादींनी अधिवेशनाला मार्गदर्शन केले.

❖ **क्रेडाई महाराष्ट्र – अहमदनगर**

क्रेडाईच्या महाराष्ट्र राज्यस्तरीय शाखेची सर्वसाधारण सभा अहमदनगर येथे संपन्न झाली. यावेळी दीप प्रज्ज्वलन क्रेडाईचे अध्यक्ष श्री. शांतीलालजी कटारिया व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

❖ **राका ज्वेलर्स – सन्मान**

ज्वेलरी क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी करुन देशाची औद्योगिक प्रगती करणाऱ्या भारतातील ज्वेलर्सचे सर्वेक्षण यु.बी.एम. इंडिया या संस्थेद्वारे नुकतेच करण्यात आले. या सर्वेक्षणानंतर 'इंडियाज्‌ मोस्ट प्रिफर्ड ज्वेलर्स' हा किताब महाराष्ट्रातील रांका ज्वेलर्सला देण्यात आला.

❖ **श्री. बाबुलालजी जैन, मुंबई**

समग्र जैन चातुर्मास सुचीचे प्रमुख संपादक श्री. बाबुलालजी जैन ''उज्ज्वल'' मुंबई यांना श्रमणसंघीय आचार्य डॉ. शिवमुनिजी म.सा. यांच्या पावन निश्रेत इंदौर येथे गोल्डन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्‌ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

❖ **श्री. अशोकजी तातेड, निगडी – रक्तदान शिबिर**

निगडी येथील श्री. अशोकजी तातेड परिवारातर्फे स्व. मातोश्री श्रीमती फुंदाबाई तातेड यांच्या १८ व्या स्मृतिदिना निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

करण्यात आले. या शिबिराचे उद्‌घाटन उद्योजक श्री. जयकुमारजी चोरडिया, श्री. सुभाषजी ललवाणी यांच्या हस्ते श्री. अशोकजी तातेड, सौ. सुरेखा तातेड, श्री. सागर तातेड सौ. एकता तातेड, इत्यादींच्या उपस्थितीत करण्यात आले.

❖ **प्लॅनेट आय रियॅलिटी, तळेगाव**

प्लॅनेट आय रियॅलिटी व प्राईम रिअॅल्टी या पुण्यातील प्रतिथयश डेव्हलपर्सच्या तळेगाव येथील ''लाईफ लॅण्डस'' या १४.६५ एकरच्या विकसीत एन.ए. प्लॉटस्‌च्या प्रॉजेक्टमध्ये १४ जानेवारी २०१८ संक्रातीचे दिवशी भव्य 'पतंग व हुरडा महोत्सव' आयोजित केला होता. यावेळी सर्वांचे स्वागत श्री. किर्तीकुमारजी ओसवाल, श्री. बिपीन भंडारी, श्री. गुणेश संचेती व श्री. संतोषजी जैन यांनी केले. ●

# समभाव

**डॉ. रमेश 'मयंक', चितौडगढ**

मानव-जीवन
अत्यन्त दुर्गम और दुर्लभ
यह पुन: प्राप्त होगा या नहीं
इसकी अनिश्चितता को देखकर
किसी ने भी निश्चितता नहीं कहीं

आइए -
संशय को दूर करें
जितना सार्थक यह जीवन कर सकें
उतना अवश्य करें,
ऐन्द्रियक सुखों में उलझकर
जीवन का महत्त्व नहीं समझ पाते
सत्य को नहीं जानते
बोध से रह जाते अनजान,
बिना सज्जन-संगति
और स्वाध्याय के बनना चाहते महान्

अवसर का लाभ नहीं उठाया
और चूँक गए तो
जब आएगा - अवसान
तब -
पश्चाताप मात्र रह जाएगा
बीता हुआ समय
लौटकर नहीं आएगा

आओ -
समय की नब्ज को पहचान जाएँ
सही उपयोग में
अपना समय-जीवन और ऊर्जा लगाएँ
मनुष्यत्व को अपनाएँ
धर्म श्रवण में मन रमाएँ
श्रद्धा-संयम से पराक्रम को अपनाएँ

जब अपने सोच में बदलाव आएगा
दुख मुक्ति हेतु भटकना नहीं होगा
समभाव बनेगा अमोघ कवच
आत्मा रूपी निर्मल गगन में
अपनी प्रखरता से उदित होगा
समभाव रूपी सूर्य बनकर सच

दुख का कारण-मानसिक विषमता
जिसे मिटाया जा सकता है
मन में लाकर भावमय समता
सामायिक से पापों का त्याग करें
स्वाध्याय से ज्ञान का अनुराग करें
तप द्वारा होती मुक्ति
कथन को स्वीकार - निर्विवाद करें। ●